पुणे महानगरपालिका कर्मचाऱ्यांचे मुखपत्र

# कल्याणवार्ता

• अंक : २६ • जानेवारी २०१३ • पृष्ठे ४

इंटरनेट आवृत्ती - www.punecorporation.org

## विविध क्रीडा स्पर्धांचे शानदार उद्घाटन

कामगार कल्याण निधीच्या विहित उद्देशानुसार सन २०१२-१३ या आर्थिक वर्षामध्ये सभासद सेवकांमधील कलागुणांना वाव देवून परस्परांमध्ये समन्वय साधण्यासाठी दिनांक १४ ते १९ जानेवारी, २०१३ या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धांचे (क्रिकेट, व्हॉलिबॉल, कबड्डी, बुध्दिबळ, कॅरम, कुस्ती, १०० मिटर धावणे, थ्रो बॉल, संगित खुर्ची, टेबल टेनिस, बॅडमिंटन, गोळाफेक)



आयोजन करण्यात आले होते. या क्रीडा स्पर्धांचा उद्घाटन समारंभ दिनांक १४/१/१३ रोजी सकाळी १० वाजता पं.नेहरु स्टेडियम येथे आयोजित करण्यात आला होता. या उद्घाटन समारंभामध्ये विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभागी झालेले सर्व खेळाडू उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून मा. अविनाश बागवे, अध्यक्ष, क्रीडा समिती, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते. तसेच मा. मंगेश जोशी, उप आयुक्त, समाज कल्याण, मा. अरुण खिलारी, महापालिका सहाय्यक आयुक्त, मा. मंजुषा इधाटे, विधी सल्लागार, मा. श्रीरंग राजपाठक, व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम यांची विशेष उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मा. शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार) तथा सचिव, कामगार कल्याण निधी यांनी केले. प्रास्ताविकामध्ये कामगार कल्याण निधीतर्फे सालाबादप्रमाणे विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यामागील उद्देश विषद करुन या वर्षीही मोठ्या संख्येने सेवकांनी सहभाग घेतल्याबद्दल श्री. दौंडकर यांनी सर्वांचे स्वागत केले. तसेच, कामगार कल्याण निधीमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांबाबत माहिती दिली व कामगार कल्याण निधी हा सेवकांचा असल्याने सर्व सेवकांनी त्याचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले. तदनंतर उद्घाटनपर मार्गदर्शनामध्ये शारिरीक आणि मानसिक आरोग्य सदृढ ठेवून कामकाजातील गुणवत्ता वाढविण्यासाठी खेळ हे महत्वाचे साधन आहे. तसेच, कोणत्याही खेळाने खेळाडूमध्ये एकाग्रता व कार्यक्षमता वाढीस मोठ्या प्रमाणावर मदत होते. त्यामुळे जास्तीत जास्त सेवक/अधिकारी यांनी खेळामध्ये सहभागी व्हावे, असे मा. बागवे यांनी स्पष्ट केले. तसेच, पुणे महानगरपालिकेतील सेवकांसाठी क्रीडा समितीमार्फत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. त्यांचाही सर्व सेवकांनी लाभ घ्यावा. जे खेळाडू किंवा संघ आंतरराज्य, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत अशा खेळाडू व संघांनी आपली नावे क्रीडा प्राधिकाऱ्यांकडे नोंदणी करुन घ्यावीत. जेणेकरुन त्यांना विविध क्रीडा स्पर्धांमध्ये भाग घेण्यामध्ये अडचणी निर्माण होणार नाहीत. क्रीडा स्पर्धांच्या उद्घाटनासाठी प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते मनपा भवन आणि पाणीपुरवठा विभाग यांच्यातील क्रिकेट सामन्याची नाणेफेक करुन सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी केले. क्रीडा स्पर्धांच्या आयोजनामध्ये सल्लागार (कामगार) कार्यालयातील सिनिअर ग्रेड लेखनिक श्री. अजय कारंडे व शिपाई सेवक श्री. रघुनाथ गेजगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## सहृदय आभार

कामगार कल्याण निधीमार्फत दिनांक १४ ते १९ जानेवारी, १३ या कालावधीत विविध क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धा पं.नेहरु स्टेडियम, मध्यवर्ती अग्निशामक केंद्र, मामासाहेब मोहोळ संकुल, सणस स्पोर्टस मैदान व क्लब येथे संपन्न झाल्या. या स्पर्धांच्या आयोजनामध्ये प्रत्येक क्रीडा प्रकारासाठी नियुक्त करण्यात आलेले समन्वयक, क्रीडा असोसिएशनचे पदाधिकारी, उद्घाटन समारंभास उपस्थित विविध क्रीडा प्रकारात नैपुण्य मिळविलेले खेळाडू व प्रमुख पाहुणे, नेहरु स्टेडियमचे व्यवस्थापक मा. श्रीरंग राजपाठक, नेहरु स्टेडियम व सल्लागार (कामगार) कार्यालयाकडील सेवकवर्गाच्या भरीव सहकार्याचा प्रमुख वाटा होता. या सर्वांकडून भविष्यकाळात याच सहकार्याची अपेक्षा, कामगार कल्याण निधीमार्फत सर्वांचे हार्दिक आभार.

## बुध्दिबळ स्पर्धेत अमोल पुंडे सर्वोत्तम

कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवांतर्गत दिनांक १५ व १६ जानेवारी, २०१३ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे बुध्दिबळ स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध विभागाकडील एकूण २२ सेवकांनी सहभाग घेतला होता. अधिकारी व श्री. श्रीरंग राजपाठक, व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम हे उपस्थित होते. या स्पर्धेमध्ये धनकवडी क्षेत्रीय कार्यालयाकडील प्रभाग अधिकारी श्री. अमोल पुंडे यांनी विजेतेपद मिळविले तर नगरसचिव कार्यालयाकडील श्री. पांडुरंग अडसुळ



यांना उपविजेतेपद प्राप्त झाले. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दिनांक १५/१/२०१३ रोजी सकाळी ९ वाजता करण्यात आला. उद्घाटन समारंभ प्रसंगी श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण यांना उपविजेतेपद प्राप्त झाले. या स्पर्धांचे समन्वयक म्हणून या स्पर्धेचे समन्वयक म्हणून श्री. पांडुरंग अडसुळ यांनी काम पाहिले.

## कॅरम स्पर्धेत गायकवाड व कराडे विजयी

कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवामध्ये दिनांक १५ व १६ जानेवारी, स्पर्धेमध्ये पुरुष गटामध्ये श्री. बाळू गायकवाड यांनी प्रथम क्रमांक व श्री. शकिल शेख यांनी द्वितीय क्रमांक



२०१३ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे कॅरम स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये विविध विभागाकडील एकूण ४० सेवकांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचा उद्घाटन समारंभ दिनांक १५/१/२०१३ रोजी सकाळी ९ वाजता झाला. या पटकाविला. महिला गटामध्ये श्रीमती रजनी कराडे यांनी प्रथम क्रमांक व श्रीमती वैशाली राडे यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. या स्पर्धांचे समन्वयक म्हणून श्री अरुण चांदणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## संपादकीय...

### टपाल हाताळणी

प्रत्येक संस्थेचे उद्दिष्ट व कर्तव्यपालन करणेकामी त्या अनुषंगाने माहितीचे संकलन, नोंद आणि विश्लेषण करणे तसेच, अशी संकलित माहिती आवश्यकतेनुसार उपलब्ध करुन देणे ही मुलभूत आणि प्राथमिक जबाबदारी आहे. दैनंदिन कामामध्ये संस्थेची उद्दिष्टे परिणामकारकपणे साध्य करण्यासाठी पत्रव्यवहार करणे, टपालाची आवक जावक, कार्यनियोजन, कार्यविभाजन, अधिकार सुपूर्ती आणि कालमर्यादा विहित करणे, इत्यादी कामे संस्थेच्या कार्यालयामार्फत पार पाडणे अनिवार्य आहे. यामध्ये कार्यालयात येणारी व जाणारी पत्रे व प्रकरणे यांच्या नोंदी अचूक ठेवणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी प्रत्येक कार्यालयामध्ये स्वतंत्र आवक जावक (बारनिशी) नोंदव्यवस्था व त्यासाठी आवश्यक सेवकवर्गाची नियुक्ती करण्यात आलेली असते.

टपाल हाताळणी हे कार्यालयाचे एक प्रमुख व महत्वाचे काम आहे. एवढेच नाही तर व्यवस्थेमधील ते एक महत्वाचे अंग आहे. संस्थेचे व्यापक हित सांभाळण्यासाठी कार्यालयाची टपाल हाताळणी तत्पर व कार्यक्षम असणे अनिवार्य आहे. जेंव्हा संस्थेत अनेक खाती कार्यरत असतात व आवक जावक टपालाची उलाढाल मोठ्या प्रमाणावर होत असते तेंव्हा त्या कामासाठी नियोजनपूर्व त्या विभागाची रचना करणे आवश्यक असते. या विभागामध्ये कार्यक्षम कर्मचाऱ्याची नियुक्तीही आवश्यक ठरते. कारण कार्यालयातील पत्रव्यवहार अचूक व वेळेत होणे यावर संबंधित कार्यालयाची कार्यक्षमता व उद्दिष्टपूर्तीच्या दिशेने टाकलेले निश्चित व खंबीर पाउल होय. टपाल हाताळणी योग्य तऱ्हेने केली गेली नाही तर टपाल स्विकारणे आणि वितरण करणेमध्ये दिरंगाई होईल. टपाल वेळेवर न मिळाल्याने इतर विभागातील कामावर त्याचा विपरित परिणाम होतो. त्यामुळे टपाल हाताळणी परिणामकारक असेल तर श्रम, वेळ आणि खर्च यामध्ये बचत होते. टपाल हाताळणीवर व्यवस्थापन, कार्यालयाचे स्वरुप, आकार, गर्दीचा वेळ, कार्यालयातील यांत्रिकीकरण, इत्यादी घटकांचे परिणाम होत असतात व त्याचे रुपांतर त्या कार्यालयाच्या कार्यक्षम कार्यशैलीत होते व याच कार्यशैलीतून कार्यालयाची आदर्श प्रतिमा निर्माण होते.

कार्यालयामध्ये दैनंदिन विविध प्रकारचा पत्रव्यवहार होत असतो. ही सर्व पत्रे योग्य तो विभाग किंवा अधिकाऱ्याकडे पाठविणे आवश्यक असते. टपाल हाताळणी यंत्रणेमध्ये सर्वसाधारणपणे टपाल स्विकारणे, टपालाचे वर्गिकरण करणे, टपाल उघडणे, टपालावरील मजकुराची छाननी करुन, टपालावर योग्य व अचूक शेरे नमूद करणे आणि अंतिमत: त्याच्या नोंदी योग्य ठिकाणी करणे, इत्यादी महत्वाचे टप्पे आढळून येतात. त्याशिवाय विविध विभागांकडे वेळेत टपालांचे वितरण करणे अनिवार्य आहे.

महापालिकेमध्ये प्रत्येक विभागामधून टपाल हाताळणी आवक व जावक बारनिशीद्वारे केली जाते. प्रत्येक विभागामध्ये यासाठी स्वतंत्र सेवकाची नेमणुक करण्यात आली आहे. कार्यालयीन कामकाजामध्ये वेळेचा अपव्यय व गैरसोय टाळणेसाठी या सेवकांनी टपाल हाताळणी परिणामकारक रितीने करणे आवश्यक आहे. विविध विभागांकडून आलेली प्रकरणे, वरिष्ठ अधिकारी, नागरिक, लोक प्रतिनिधी, इत्यादींकडून आलेली प्रकरणे आणि पत्रे यांची व्यवस्थित नोंद घेणे अनिवार्य आहे. तसेच, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून ज्या प्रकरणी पुढील कार्यवाही विहित मुदतीत करणे आवश्यक आहे, अशा प्रकरणी विशेष दक्षता बाळगून त्याच्या नोंदी स्वतंत्र नोंदवहीत करुन त्याबाबत पाठपुरावा करणे आवश्यक ठरते. टपाल स्विकारण्यापूर्वी संबंधित सेवकाने ते आपल्या विभागाशी संबंधित आहे, आपल्या विभागाला निर्देशित केलेले आहे, पेजिंग फायलिंग व्यवस्थित केले आहे, संदर्भ सोबत जोडलेले आहेत, खातेप्रमुखांची स्वाक्षरी आहे, इत्यादी बाबींची खातरजमा करणे अत्यावश्यक आहे. त्याशिवाय अल्पावधीत ज्या पत्रांवर किंवा प्रकरणांवर कार्यवाही होणे गरजेचे आहे अशी प्रकरणे वा पत्रे सत्वर वरिष्ठांच्या निदर्शनास आणून देणे ही महत्वाची भूमिका संबंधितांना पार पाडणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे नागरिक, शासकीय/निमशासकीय संस्था व अंतर्गत विभागांकडे करण्यात येणारा पत्रव्यवहारही काळजीपूर्वक करणे अपेक्षित आहे.

हल्लीच्या माहिती व तंत्रज्ञानाच्या युगामध्ये कागद विरहित प्रशासन ही संकल्पना मुळ धरीत आहे. यामध्ये ई-मेल, फॅक्स, वेबसाईट, इंटरनेट, इत्यादी इलेक्ट्रॉनिक यंत्रणेमार्फत माहितीची मोठ्या प्रमाणावर देवाणघेवाण होत असते. तसेच, संगणकाद्वारे विविध कार्यालये एकमेकांशी लॅनद्वारे जोडून आवक जावक बारनिशीचेही काही प्रमाणात संगणकीकरण करण्यात येत आहे. हीच पध्दती एकसूत्रपणे सर्व विभागांसाठी अंमलात आणून यंत्रणा गतिमान व सुसूत्र करणे कालानुरुप आवश्यक आहे.

## ओळख गुणवंताची-श्री.अजय गोळे

ओळख गुणवंताची या सदरात आज आपण आयातकर कार्यालयाकडील ज्युनिअर ग्रेड लेखनिक श्री. अजय गोळे यांची ओळख करुन घेणार आहोत.

श्री. अजय लक्ष्मण गोळे यांचे प्राथमिक शिक्षण पुणे महानगरपालिकेच्या शाळा क्र. ७ मुलांची, क्रांतीवीर लहुजी वस्ताद विद्यालय, भवानीपेठ येथे झाले. शाळेत असताना त्यांचा खेळाकडे व नाटकाकडे विशेष कल होता. सन १९८५-८६ मध्ये त्यांनी नाटकामध्ये बालकलाकार म्हणून विशेष पुरस्कार प्राप्त केले. तसेच १९८६-८७ मध्ये महाराष्ट्र राज्य, जागर संघटना तसेच किलबिल रंगभूमीकडून नाटकातील भूमिकेबद्दल त्यांना उत्कृष्ट अभिनयाचे प्रमाणपत्र मिळाले. अग्निशामक दलाने सन १९८९ मध्ये सादर केलेल्या "अपराध मीच केला" या व्यावसायिक नाटकामध्ये श्री. गोळे यांनी बालकलाकाराची प्रमुख भूमिका केली होती.

श्री. अजय गोळे यांचे वडिल अग्निशामक दलामध्ये फायरमन या पदावर कामास होते. त्यामुळे अग्निशामक दलातील शिस्त लहानपणापासूनच त्यांच्या अंगी होती. तसेच, आई पुणे मनपा शिक्षण मंडळामध्ये सेविका होती. त्यामुळे त्यांचेवर शैक्षणिक संस्कार बालपणापासूनच होत गेले. त्यांचे वडिल शारिरीक कसरती करीत व ते स्वत: मल्ल असल्याने त्यांनी मुलामध्येही तालमीची कसरत व व्यायामाची आवड निर्माण केली. पं. नेहरु स्टेडियम येथील महाराणा प्रताप व्यायामशाळेमध्ये सन १९८८ ते १९९४ पर्यंत बॉडी बिल्डिंगचे प्रशिक्षण घेतले व त्यानंतर त्यांना अनेक शरीर सौष्ठव पुरस्कार मिळाले. सन १९९४ मध्ये अग्निशामक दलामध्ये ॲम्ब्युलन्स अटेंडंट या पदावर रुजू झाल्यानंतर अग्निशामक दलातील सेवकांनी निर्माण केलेल्या व्यायामशाळेमध्ये अनेक सेवकांना त्यांनी बॉडी बिल्डिंगचे प्रशिक्षण दिले आहे. अग्निशामक दलामध्ये ॲम्ब्युलन्सवर काम करीत असताना श्री. गोळे यांनी बी.ए.पर्यंतचे शिक्षण घेतले. त्यांना लहानपणापासूनच इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे दुरुस्त करण्याची आवड होती. ही आवड जोपासण्यासाठी त्यांनी श्री. नारळीकर इन्स्टिट्यूट, पुणे येथून एलईआरएस/एलईव्हीएस ही इलेक्ट्रॉनिक डिग्री धारण केली. नोकरी करीत असताना इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे दुरुस्त करणे व निर्माण करणे ही आजही त्यांची फावल्या वेळेतील आवड आहे.

अग्निशामक दलामध्ये असताना श्री. अजय गोळे यांनी पुणे महानगरपालिका कामगार युनियनच्या कामाला सुरवात केली. यामध्ये त्यांना मा. मुक्ता मनोहर, सरचिटणीस, पुणे मनपा कामगार युनियन व कॉ.प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष यांचे मार्गदर्शन लाभले. श्री. गोळे यांनी १ मे कामगार दिनानिमित्त कामगार कल्याण निधीमार्फत आयोजित गुणदर्शन कार्यक्रम व क्रीडा स्पर्धेत भाग घेणेबाबत अग्निशामक दलातील सेवकांना प्रोत्साहित केले. तसेच, पुणे मनपातर्फे राबविल्या जाणाऱ्या कामगार प्रशिक्षण वर्गास सहभागी होणेबाबत सेवकांना मार्गदर्शन केले. १४ एप्रिल अग्निशामक दल



सप्ताहाचे निमित्ताने सेवकांचे विविध गुणदर्शन व सांस्कृतिक कलागुणांना वाव देण्यासाठी कार्यक्रमांचे आयोजन केले.

सन २००७ मध्ये त्यांची ॲम्ब्युलन्स अटेंडंट या पदावरुन ज्युनिअर ग्रेड लेखनिक या पदावर कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालय येथे बदली झाली. सन २००८ मध्ये क्षेत्रीय अधिकारी मा. माधव जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी कसबा विश्रामबागवाडा क्षेत्रीय कार्यालयामध्ये सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरवात केली. या कार्यालयामध्ये काम करीत असताना मा. सुनिल केसरी, क्षेत्रीय अधिकारी, यांच्या मार्गदर्शनाखाली नुकत्याच मनपाकडे समाविष्ट झालेल्या विवाह नोंदणी कार्यालयाकडे त्यांची नियुक्ती झाली. विवाह नोंदणीचे काम करीत असताना कॅप्टन श्री. संदिप मंडाले, ४०३, एअरलाईन डिफेन्स रेजिमेंट (संयुक्त) रा. पुणे यांची विवाह नोंदणी विनाविलंब व तात्काळ करुन दिली. कॅप्टन संदिप मंडाले यांनी मा. महापालिका आयुक्त श्री. महेश झगडे यांना पत्र देवून श्री. गोळे यांच्या कार्यतत्परतेबाबत कळविले. वरील कामाची दखल घेवून तत्कालीन महापालिका आयुक्त यांनी लेखी पत्र देवून त्यांचे हार्दिक अभिनंदन केले.

नाटकाचा वारसा घेवून आलेले श्री.अजय गोळे यांची भेट श्री.गणेश कदम यांच्याशी झाली. कदम यांच्या लेखनीचे चातुर्य व सामाजिक बांधिलकी यातून प्रवृत्त होणारा कलाकार भेटल्यानंतर सामाजिक विषयावर प्रबोधनपर लघुपटाची निर्मिती व दिग्दर्शन श्री.कदम यांनी केले व त्याला अजय गोळे व मनपाकडील दहा सेवकांनी साथ दिली. फ्लायओव्हर हा लघुपट पुढे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाच्या नामांकनातही गेला.

सन २०११ मध्ये पीएमसी एम्प्लॉईज युनियनच्या कार्याध्यक्षपदी श्री. अजय गोळे यांची नियुक्ती झाली. पुणे महानगरपालिकेमध्ये काम करीत असताना सेवकांचे प्रश्न सोडवत असताना त्यांना मा. मुक्ता मनोहर, सरचिटणीस, मा. प्रकाश जाधव, कार्याध्यक्ष, पुणे मनपा कामगार युनियन, मा पांडुरंग सावंत, जनरल सेक्रेटरी, पीएमसी एम्प्लॉईज युनियन यांचे वेळोवेळी मार्गदर्शन लाभते.

प्रशासनामध्ये काम करीत असताना मा. सुनिल केसरी, उप आयुक्त, मा. शिवाजी दौंडकर, सल्लागार (कामगार), मा. विलास कानडे, आयातकर प्रमुख, मा. उमेश माळी, मा. माधव जगताप, मा. अरुण खिलारी, महापालिका सहाय्यक आयुक्त यांचे नियमित मार्गदर्शन लाभते.

सन २०१२ मध्ये श्री. गोळे यांची आयातकर कार्यालयाकडे बदली झाली. महानगरपालिकेचे उत्पन्नाचे प्रमुख स्त्रोत असलेले जकात खाते व तेथील कामाच्या पध्दती यांचा अभ्यास करुन त्यांनी मा. आयातकर प्रमुख यांना वेळोवेळी उत्पन्न वाढीसाठी उपाययोजना सुचविल्या व स्वत: गस्तीपथक निरीक्षक असल्याने जकातीमधील गळती रोखण्याचा प्रयत्न ते करीत असतात.

श्री.अजय गोळे यांनी केलेल्या उल्लेखनीय कामगिरीची दखल घेवून त्यांची सन २००९-१० या वर्षामधील गुणवंत कामगार पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. जेष्ठ समाजसेवक मा.भाई वैद्य व महापौर मा.वैशाली बनकर यांच्या हस्ते गुणवंत कामगार पुरस्कार देवून त्यांचा गुणगौरव करण्यात आला. यापुढे पुणे मनपा सेवकांना काम करीत असताना येणाऱ्या अडचणी अभ्यासू वृत्तीने त्या प्रशासनासमोर मांडणे व त्यांची सोडवणूक करणे, तसेच पुणे मनपा सेवकांना पुणे म्युनिसिपल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँक लि.या मनपा सेवकांच्या बँकेमार्फत कमी व्याजदरात कर्ज पुरवठा करणे व गुंतवणुकीवर योग्य व्याज मिळवून देणे यासाठी पुढील काळात कार्यशील होण्याचे वचन त्यांनी दिले आहे. श्री.गोळे यांच्या पुढील कारकिर्दीसाठी कामगार कल्याण निधीतर्फे हार्दिक शुभेच्छा.

## जगताप, भाडळे, इधाटे व परदेशी टेबल टेनिसमध्ये विजेते



कामगार कल्याण निधीमार्फत आयोजित करण्यात आलेल्या क्रीडा महोत्सवांतर्गत दिनांक १६/१/२०१३ रोजी सकाळी ९ पासून पं. नेहरु स्टेडियम येथे टेबल टेनिस स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे औपचारिक उद्घाटन मा. सुबोध देशपांडे यांचे हस्ते करण्यात आले. सुरवातीस श्री. नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी प्रमुख पाहुण्यांचा अल्प परिचय करुन दिला तसेच, पुष्पगुच्छ देवून प्रमुख पाहुण्यांचे स्वागत केले. या प्रसंगी प्रमुख पाहुणे मा. देशपांडे यांनी टेबल टेनिस हा खेळ सर्व कर्मचाऱ्यांनी खेळणे आवश्यक आहे. कारण टेबल टेनिसमुळे कामामध्ये लागणारी एकाग्रता, शारिरीक स्वास्थ्य व मनाचा कणखरपणा प्राप्त होण्यास मदत होते. कामगार कल्याण निधीमार्फत आयोजित स्पर्धांमध्ये मोठ्या संख्येने स्पर्धकांनी सहभाग घेवून खेळाचा आनंद घेतला पाहिजे, असे नमूद केले. ही स्पर्धा एकेरी व दुहेरी अशा दोन स्तरांवर घेण्यात आली. तसेच, महिला सेविकांसाठीही ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. पुरुष एकेरीमध्ये श्री. नंदकुमार जगताप यांनी प्रथम तर श्री. रविंद्र भाडळे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. दुहेरी स्पर्धेमध्ये श्री. नंदकुमार जगताप व श्रीरंग राजपाठक या जोडीने प्रथम व रविंद्र भाडळे व दिपक एकबोटे यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. तसेच, महिला एकेरीमध्ये श्रीमती मंजुषा इधाटे यांनी प्रथम व श्रीमती सुप्रिया परदेशी यांनी द्वितीय क्रमांक मिळविला. दुहेरी स्पर्धेमध्ये श्रीमती मंजुषा इधाटे व श्रीमती मिनाक्षी ठाकुर या जोडीने प्रथम क्रमांक मिळविला तर श्रीमती सुप्रिया परदेशी व श्रीमती पल्लवी बेहेरे यांनी द्वितीय क्रमांक प्राप्त केला.

## संगित खुर्ची, गोळा फेक, १०० मी. धावणे व थ्रो बॉल स्पर्धेस महिलांचा सहभाग
### पुणे मनपा सेवकांमधील सर्वात वेगवान महिलेचा मान श्रीमती सोनाली गारगोटे यांना



कामगार कल्याण निधीमार्फत दिनांक १७/१/२०१३ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे फक्त महिलांसाठी आयोजित करण्यात आलेल्या संगित खुर्ची, १०० मी. धावणे, गोळा फेक व थ्रो बॉल स्पर्धेस महिला सभासद सेवकांचा उत्तम प्रतिसाद लाभला. संगीत खुर्ची स्पर्धेमध्ये श्रीमती रजनी कराडे यांनी प्रथम, श्रीमती सना शेख यांनी द्वितीय व श्रीमती स्मिता पाटील यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. १०० मी. धावणे स्पर्धेमध्ये १८ ते ३५ वयोगटात श्रीमती सोनाली गारगोटे यांनी प्रथम, श्रीमती विद्या शिरस यांनी द्वितीय व श्रीमती सुप्रिया ताम्हाणे यांनी तृतीय क्रमांक पटकाविला. ३५ ते ५० वयोगटात श्रीमती रसिका निघुट यांनी प्रथम, श्रीमती वैशाली शिंदे यांनी द्वितीय व श्रीमती वनिता दरपे यांना तृतीय क्रमांक पटकाविला. गोळा फेक स्पर्धेमध्ये श्रीमती सोनाली गारगोटे यांनी प्रथम क्रमांक, श्रीमती विद्या शिरस यांना द्वितीय क्रमांक व श्रीमती सुप्रिया ताम्हाणे यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला. थ्रो बॉल स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक श्रीमती वैशाली राडे, द्वितीय क्रमांक श्रीमती वैशाली शिंदे व तृतीय क्रमांक श्रीमती माधुरी गानु यांना मिळाला. या स्पर्धांचे समन्वयक म्हणून श्रीमती सुप्रिया परदेशी, श्रीमती राधिका जगताप, श्रीमती साधना शेळके, श्रीमती कविता पत्की, श्रीमती रसिका निघुट, श्रीमती वृषाली गायकवाड, श्रीमती मिनाक्ष ठाकुर व श्रीमती संगिता सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले.

## कबड्डी,व्हॉलीबॉल व बॅडमिंटन स्पर्धांमधील विजेते



कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित स्पर्धांतर्गत दिनांक १८/१/१३ रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे कबड्डी स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये आरोग्य विभागाने प्रथम क्रमांक व सांख्यिकी व संगणक विभागाने द्वितीय क्रमांक मिळविला.

दिनांक १७ ते १९ जानेवारी, १३ रोजी मध्यवर्ती अग्निशामक केंद्र, भवानीपेठ येथे व्हॉलीबॉल (पासिंग व शुटिंग) स्पर्धा आयोजित करण्यात आली. या स्पर्धेमध्ये प्र थम व द्वितीय क्रमांक अग्निशामक दल विभागाने पटकाविला.

बॅडमिंटन स्पर्धांचे दिनांक १७ व १८ जानेवारी, १३ रोजी सणस स्पोर्ट्स क्लब येथे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये पुरुष व महिला असे दोन विभागांमध्ये व पुरुष एकेरी व दुहेरी तसेच महिला एकेरी अशा स्पर्धा घेण्यात आल्या. पुरुष एकेरी गटामध्ये श्री. नितीन देशपांडे यांनी प्रथम तर डॉ. रमेश चव्हाण यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. पुरुष दुहेरी गटामध्ये श्री. रामचंद्र शिंदे व श्री. नितीन देशपांडे यांनी प्रथम तर डॉ. रमेश चव्हाण व श्री. प्रल्हाद बाबर यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला. महिला एकेरी गटामध्ये श्रीमती सुचेता गोगरे यांनी प्रथम तर श्रीमती पल्लवी बेहेरे यांनी द्वितीय क्रमांक पटकाविला.

## कुस्ती स्पर्धा मामासाहेब मोहोळ संकुलात संपन्न

कामगार कल्याण निधीमार्फत कामगारांसाठी आयोजित करण्यात आलेल्या स्पर्धांतर्गत कुस्ती स्पर्धांचे आयोजन दिनांक १८/१/१३ रोजी मामासाहेब मोहोळ संकुल, कात्रज येथे करण्यात आले होते. या स्पर्धा ७ वजन किलो गटामध्ये श्री. अजय लोंढे, ७४ किलो गटामध्ये श्री. सचिन आवाळे, ८४ किलो गटामध्ये श्री. राजू मोहोळ, ९६ किलो गटामध्ये श्री. युवराज नांगरे व ९६ किलोच्या पुढील गटामध्ये श्री. हनुमंत नांगरे विजयी झाले.



गटांनुसार घेण्यात आल्या. ५५ किलो वजनगटामध्ये श्री. दिलीप कवितके, ६० किलो गटामध्ये श्री. संतोष जंगम, ६६

कुस्ती स्पर्धांचे समन्वयक म्हणून श्री. दिलीप कवितके यांनी कामगिरी बजावली.

## क्रिकेटमध्ये उप आयुक्त क्र. १ संघ विजेता

कामगार कल्याण निधींतर्गत आयोजित करण्यात आलेल्या क्रिकेट स्पर्धा दिनांक १४ ते १९ जानेवारी या कालावधीत पं.नेहरु स्टेडियम येथे पार पडल्या. यामध्ये एकूण १२ संघ सहभागी झाले होते. स्पर्धेतील साखळी सामने एकूण १५ षटकांचे तसेच उपांत्य व अंतिम सामना २० षटकांचा खेळविण्यात आला. यामध्ये उप आयुक्त (वि.का.क्र.१) अग्निशमन दलास द्वितीय क्रमांक मिळाला. उत्कृष्ट गोलंदाज म्हणून श्री. मोहन कुलकर्णी, उत्कृष्ट फलंदाज म्हणून श्री. देवदत्त देवकर, मॅन ऑफ द मॅच म्हणून श्री. जितेंद्र बागे व मॅन ऑफ द सिरीज म्हणून श्री. सुरेश शिंदे यांची निवड झाली. सामन्यांच्या यशस्वी आयोजनात व्यवस्थापक, पं.नेहरु स्टेडियम, मा.श्रीरंग राजपाठक, श्री.प्रदीप महाडिक,



आणि अग्निशामक दल या संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव करुन अंतिम फेरी गाठली. अंतिम सामना दि.२० जानेवारी रोजी पं. नेहरु स्टेडियम येथे संपन्न झाला. यामध्ये उप आयुक्त (वि.का.क्र.१) या संघाने विजय प्राप्त करुन अजिंक्यपद मिळविले तर श्री.देवदत्त देवकर, श्री.गणेश मांजरे, श्री.लक्ष्मीकांत शिंदे, श्री.निलेश चव्हाण, श्री.जितेंद्र बागे, श्री.कृष्णा बगाडे, श्री.मोहन कुलकर्णी, श्री.मल्हारी माकर, श्री.अरुण चांदणे, श्री.गोविंद पळसकर, पं. नेहरु स्टेडियम येथील कर्मचारी यांचा मोलाचा वाटा होता.

## माहे जानेवारी, २०१३ सेवापूर्ती समारंभ

दि.३१/१/१३ रोजी कै. वडके हॉल येथे जानेवारी, २०१३ मधील सेवानिवृत्त २८ अधिकारी/सेवकांसाठी सेवापूर्ती समारंभ आयोजित केला होता. केली.तदनंतर मा.उदास यांनी महापालिकेची दीर्घ सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांचे महापालिकेतर्फे आभार मानले व सेवानिवृत्त सेवकांनी महापालिकेने



यामध्ये १९ वयपरत्वे व ९ ऐच्छिक सेवानिवृत्तांचा सत्कार करण्यात आला.प्रमुख पाहुणे म्हणून मा.नितीन उदास, महा.सहाय्यक आयुक्त, औंध क्षेत्रीय कार्यालय, श्री.बापू पवार, अध्यक्ष, पीएमसी एम्प्लॉईज युनियन, श्री.गोडबोले सेवानिवृत्त सेवक संघ हे उपस्थित होते.

प्रास्ताविकात मा.नितीन केंजळे, कामगार कल्याण अधिकारी यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सेवापूर्ती समारंभ आयोजित करण्यामागची भूमिका विषद तुम्हाला जे चांगले दिले आहे ते आपल्या बरोबर न्यावे व जे काही वाईट अनुभव असतील ते सर्व सोडून नव्याने आपले उर्वरित आयुष्य सुखासमाधानाने व्यथित करण्याबाबत नमूद केले व सर्व सेवानिवृत्त सेवकांना भावी आयुष्यासाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. त्यानंतर सेवानिवृत्त होणाऱ्या सर्व सेवकांचा शॉल व स्मृतीचिन्ह देवून सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. सूर्यकांत चांदेरे, ज्युनिअर ग्रेड लेखनिक यांनी केले.


कल्याणवार्ता
जानेवारी, २०१३
प्रकाशक तथा अध्यक्ष
कामगार कल्याण निधी
मा. आयुक्त,
पुणे महापालिका
❖ संपादक ❖
मा.सल्लागार (कामगार)
❖ कार्यकारी संपादक ❖
कामगार कल्याण अधिकारी
❖ सहाय्यक ❖
सौ. ज्योती अ.भोसले
❖ मुद्रक ❖
जयंत पवार
व्यवस्थापक,
मुद्रणमहर्षि मामाराव दाते
मुद्रणालय, मनपा, पुणे.
❖ प्रकाशन स्थळ ❖
पुणे महापालिका
शिवाजीनगर,
पुणे ४११ ००५
या अंकात प्रसिध्द झालेल्या मतांशी प्रकाशक, संपादक, कार्यकारी संपादक व पुणे महापालिका सहमत असतीलच असे नाही.
❖ संपर्क ❖
सल्लागार (कामगार) कार्यालय,
पुणे महानगरपालिका.
दूरध्वनी क्र. २५५० १२५५/१२५२/१२५३
ईमेल आयडी
shivaji.daundkar
@punecorporation.org


## नूतन वर्षाभिनंदन

नूतन वर्षाचे स्वागत करुनी
गतवर्षाचा निरोप घेउनी
सुयश आपले चिंतितो
ईश्वर चरणी नतमस्तक होवोनी..।।१।।
सदिच्छा ठेवोनी मनोमनी
अमूर्त आपल्या कल्पनांना
मुर्त रुप लाभो सकलांना
यशकिर्तीचा ध्वज उभारावा
आपुल्या जीवनी ........।।२।।
रिध्दीसिध्दीने पाणी भरावे
निरोगी आयुष्य तुम्हा लाभावे
सुख,यश, समृध्दी
अमृताचे क्षणी वैभवाच्या सरी
तुम्हा सदनी निशिदीनी वर्षाच्या हीच
प्रभूशी मागणी ......।।३।।
आरोग्य, सुखशांती लाभो जन्मांतरी
ही एक आस आहे अंतरी
कुटुबासह नववर्षाच्या शुभेच्छा
चैत्रवेलीसम कुटुंबवेल वाढो हीच वांछा
शुभेच्छांची भावसुमने स्विकारावी
हीच विनवणी.......।।४।।
भाग्यरेखा उत्तरोत्तर वाढो परोपरी
हे वैभव जावो असेच
यशकिर्तीच्या शिखरांवरी
होवोत साकार स्वप्न आपुले
फुलांचे फुलांपरी
क्षण न क्षण जावो आनंदी व उत्साही
प्रगतीचा नंदादिप असाच उजळावा
नुतन वर्षाला हेच मागतो
करमळे जोडोनी.....।।५।।

**सौ. अलका संजय जोशी**
**परवाना व आकाशचिन्ह विभाग**

# १०० मिटर धावणे व गोळा फेक स्पर्धेस उत्स्फूर्त सहभाग

### पुणे मनपा सेवकांमधील सर्वात वेगवान पुरुषाचा मान श्री. कृष्णा बगाडे यांना

क्रीडा महोत्सवाच्या अनुषंगाने दिनांक १७ जानेवारी रोजी पं.नेहरु स्टेडियम येथे १०० मिटर धावणे आणि गोळा फेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. १०० मिटर धावण्याच्या स्पर्धेसाठी वयानुसार २ गट करण्यात आले होते. या स्पर्धेमध्ये वय वर्ष १८ ते ३५ या गटामध्ये श्री. कृष्णा बगाडे यांनी प्रथम क्रमांक, श्री. पंकज इंगवले यांनी द्वितीय क्रमांक तर श्री. अविनाश वाघमारे यांनी तृतीय क्रमांक मिळविला. वय वर्ष ३५ ते ५० या गटातून प्रथम क्रमांक श्री. बाजीराव थोपटे, द्वितीय क्रमांक श्री. अनंत टोले तर तृतीय क्रमांक श्री. प्रदिप रसाळ यांनी प्राप्त केला.

गोळा फेक स्पर्धेसाठीही वयानुसार २ गट तयार करण्यात आले होते. यामध्ये वय वर्ष १८ ते ३५ या गटामध्ये श्री. पंकज इंगवले यांना प्रथम क्रमांक, श्री. सागर काळे यांना द्वितीय क्रमांक व श्री. कृष्णा बगाडे यांना तृतीय



क्रमांक प्राप्त झाला. वय वर्ष ३५ च्या वरील गटामध्ये श्री. प्रसाद वाळुंजकर प्रथम क्रमांक, श्री. रमेश गांगड यांना द्वितीय क्रमांक व श्री. सुरेश यादव यांना तृतीय क्रमांक प्राप्त झाला. या स्पर्धांचे समन्वयक म्हणून श्री. अविनाश पंढरी व श्री. सुनिल दरेकर यांनी महत्वपूर्ण कामगिरी बजावली.

## वंदन महानगरपालिकेस

वंदन महानगरपालिके तुजला ।
करितो सगळे कर्मचारी तुजला ।
स्विकारी हिच प्रार्थना तुजला ।।
वंदन महानगरपालिके तुजला ।।
वर्धापन दिन आज उगवला ।
हर्षच झाला सकल मनाला ।
कण न कण हा रोमांचित झाला।।
वंदन महानगरपालिके तुजला ।।
स्वर सुमनांची गुंफुनि माला ।
ताल-सुरांचा मिलाफ जमला ।
भावसुमने ही समर्पित तुजला ।
वंदन महानगरपालिके तुजला ।।
सुज्ञ अधिकारी मार्गदर्शनाला ।
प्रेमळ सहकारी सहकार्याला ।
नेती आम्हा सन्मार्गाला ।
वंदन महानगरपालिके तुजला ।।
सत्य - शिस्तीचा मार्ग लाभला ।
प्रगतीचा कळस लाभो तुजला ।
त्रिवार वंदन करितो तुजला ।
वंदन महानगरपालिके तुजला ।।
धवल यशाच्या तुझ्या किर्तीला ।
नुरोत कक्ष तव मर्यादेला ।
हेच मागणे प्रभूचरणाला ।
वंदन महानगरपालिके तुजला ।।
करितो सगळे कर्मचारी तुजला ।
स्विकारी हीच प्रार्थना तुजला ।

**सौ. अलका संजय जोशी**
**परवाना व आकाशचिन्ह विभाग**



## सुनहरा मौका !

***एक हर्ष तुझे देख***
***खुशी से फूले न समाने का***
***एक रुतबा तेरी याद में,***
***गर्व से सलाम करने का***
***एक जजबा तुझे चूम***
***आसमां में फहराने का***
***ऐ परचम तिरंगे***
***जहे नसीब माँ बेटो का***
***आज मिल साथ तेरे***
***माँ भारत को नमन करने का***

**राजदीप बि.धुसिया**
**उप अभियंता,**
**परवाना व आकाशचिन्ह विभाग**

(ऋषीगुरुकुलम कातरखडक, पुणे स्थित बेटे के स्कूल में २६ जनवरी २०१३, गणतंत्र दिवस पर झंडा फहराने माँ को मिले सुअवसरपर जागा एक कृतज्ञ एवंम सद्भाव)

## गुणवंत कामगार पुरस्कार २०११-१२

**गुणवंत कामगार पुरस्कार २०११-१२ साठी विहित नमुन्यातील अर्ज सल्लागार (कामगार) कार्यालय येथे कार्यालयीन वेळेत संबंधित खातेप्रमुखांच्या शिफारशीसह दिनांक २८/२/१३ अखेर पाठवावयाचे आहेत.**

## वाचकांसाठी...

- खातेप्रमुखांच्या कार्यालयाकडून दरमहा अंक उपलब्ध करुन कार्यालयाच्या दर्शनी भागावर/सूचना फलकावर लावा.
- आपला अंक वाचून झाल्यावर दुसऱ्याला वाचण्यास द्या.
- अभिप्राय व सूचना द्या.
- नवीन स्तुत्य उपक्रम/योजना/ कार्यक्रम यांचे फोटोसहित संक्षिप्त वृत्त पाठवा.